# // प्रेसनोट //

## “इन्फ्लूएंझा (H३N२)”

देशभरामध्ये इन्फ्लूएंझा (H३N२) च्या केसेस आढळून येत असल्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती दक्षता घेणे व उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे दि.१५/०३/२०२३ रोजी मा. आरोग्य मंत्री यांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व आरोग्य अधिकाऱ्यांची Video Conference व्दारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत देण्यात आलेल्या सूचनेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकते उपाययोजनेसाठी आज दि.१६/०३/२०२३ रोजी मा. आयुक्तांच्या निर्देशानुसार मा. अति. आयुक्त यांच्या उपस्थितीत मिरा भाईंदर मुख्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सभेस वैद्यकीय नागरी आरोग्य केंद्रांचे सर्व वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

सदर सभेस इन्फ्लूएंझा (H३N२) च्या प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजनेबाबत मा. अति. आयुक्त यांनी निर्देश दिले. सर्व संशयित रुग्णांची तपासणी, त्यांना आवश्यक ते उपचार देणे, गरजे नुसार टॅमीफ्ल्युच्या गोळ्या देणे, व नोंदी ठेवणे याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या.

तसेच सर्व खाजगी रुग्णालयाना इन्फ्लूएंझा (H३N२) बाबत जागरुक राहून संशयित रुग्णांना उचित उपचार देण्यासाठी मार्गदर्शक सुचना देण्याचे निर्देश देण्यात आले.

नागरिकांना ताप, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी, घसा दुखणे, घसा खवचवणे, इ. लक्षणे आढळल्यास त्वरीत डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार घेणे आवश्यक आहे, असे आवाहन करण्यात येत आहे.

*************************************************************************************